दै. देशोन्नती.

# जन्मठेपेची शिक्षा भोगत असतांना पॅरोल रजेवर येऊन दहा वर्षापासून फरार असलेला आरोपी स्थानिक गुन्हे शाखेच्या जाळ्यात

नांदेड- जन्मठेपेची शिक्षा भोगत असताना पॅरोलवर आलेल्या फरार कैद्यास तब्बल दहा वर्षांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पकडले. पॅरोल रजेवर आल्यानंतर तो पुन्हा कारागृहात परतला नव्हता.

पोलीस अधिक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांना त्यांच्या अधिपत्याखालील पोलीस पथकांना जिल्ह्यातील पोलीस अभिलेखावरील पाहिजे व फरारी आरोपीतांची माहिती काढून त्यांना अटक करण्याचे आदेशीत केले होते.

त्यावरुन स्थागुशाचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या आदेशाने पोलीस स्थानिक गुन्हे शाखेचे विशेष पथक नेमण्यात आले. पाहिजे व फरारी आरोपींचा शोध घेत असतांना पथकास दि.७ मार्च रोजी गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, जन्मठेपेची शिक्षा भोगत असतांना सन २०१३ मध्ये पॅरोल रजेवर येऊन फरार असलेला आरोपी भगवान वामन सोळंके (वय ३३, वर्षे रा. दिग्रस (बु) ता. कंधार) हा सध्या वांजरवाडा (ता.जळकोट जि. लातुर) येथे असल्याची माहिती मिळाली.

या माहिती वरुन पोलीस उप निरीक्षक गोविंद मुंडे व त्यांचे पोलीस पथकाने अभिलेखाची पाहणी केली असता सदर आरोपीविरुध्द पोलीस. स्टेशन कंधार गुरन. १८२/२०१३ कलम २२४ भादवि प्रमाणे गुन्हा दाखल आहे. सदर आरोपीला पथकांनी वांजरवाडा (ता. जळकोट) येथे जाऊन शोध घेऊन त्यास ताब्यात घेतले. सदर आरोपी कैदी क्रमांक सी-७३८ हा हर्सुल कारागृह, छत्रपती संभाजीनगर येथे जन्मठेपेची शिक्षा भोगत असतांना सन २०१३ मध्ये पॅरोल रजेवर कारागृहाबाहेर सुटीवर आला होता. परंतु तो कारागृहात न जाता १० वर्षापासून फरार राहुन वेगवेगळया राज्यात जाऊन वास्तव्यास होता. त्याचा स्था. गु. शाखेचे पथक शोध घेत होते. फरार आरोपी भगवान सोळंके यास ताब्यात घेऊन पुढील कार्यवाहीस्तव पोलीस स्टेशन कंधार येथे दिले आहे.

सदरची कामगिरी स्थागुशाचे पोलीस निरीक्षक उदय खंडेराय यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि गोविंद मुंडे, व पोलीस हवालदार सखाराम नवघरे, शंकर मैसनवाड, विश्वनाथ इंगळे, मारोती मुंडे यांनी पार पाडली आहे.

दै. नांदेड वार्ता.

# पॅरोल रजा घेवून फरार झालेल्या आरोपीला दहा वर्षानंतर अटक

नांदेड/प्रतिनिधी- न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावल्यानंतर पॅरोल रजा घेवून गेल्या दहा वर्षापासून फरार असलेल्या आरोपीला स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांनी वांजरवाडा ता. जळकोट येथून अटक केली आहे.

पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांना फरार आरोपींची माहिती घेवून कारवाई करण्याचे निर्देश दिले होते. कंधार तालुक्यातील दिग्रस (बु.) येथील भगवान वामन सोळंके (वय ३३) या तरुणास न्यायालयाने एका प्रकरणात जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. छत्रपती संभाजीनगर येथील कारागृहात भगवान सोळंके हा शिक्षा भोगत असतांना सन २०१३ मध्ये पॅरोल रजा मंजूर करण्यात आली. पॅरोल रजा मंजूर झाल्यानंतर भगवान सोळंके तुरुंगाबाहेर आला. परंतु तो रजा संपल्यानंतर कारागृहात गेला नाही. गेल्या दहा वर्षापासून वेगवेगळ्या राज्यात राहून वास्तव्य करीत होता. दि.७ मार्च रोजी वांजरवाडा ता.जळकोट जि.लातूर येथे भगवान सोळंके येणार असल्याची गुप्त माहिती स्थानिक गुन्हा अन्वेषण विभागाच्या पोलीसांना मिळाली. पोलीस निरिक्षक उदय खंडेराय, फौजदार गोविंद मुंडे, जमादार सखाराम नवघरे, शंकर मेसनवाड, विश्वनाथ इंगळे, मारोती मुंडे यांनी सापळा रचून भगवान सोळंके यास अटक केली आहे.